Review Of Research
Vol.1,Issue.VI/March;12pp.1-4  ISSN:-2249-894X

# भारताच्या सामाजिक समतेत सुफी संप्रदायाचे योगदान

**अरुण विठ्ठल सोनकांबळे**
**छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज, सोलापूर.**

---

***प्रस्तावना*** :

इस्लाम धर्माच्या परंपरेनुसार सुफी पंथाची सुरुवात हजरत मोहम्मद पैगंबरापासुन झाली असे मानले जाते. प्रेषित ह. मो. पैगंबरांना ईश्वराचा ***साक्षा***त्कार झाल्याचे दिसुन येते. त्यांच्या साक्षात्काराचे एक फलित म्हणजे पवित्र कुराणाची निर्मिती असून दुसरे फलित म्हणजे साक्षात्कार मो.पैगंबरांना समाधी अवस्थेतून झाले. असे मानले जाते. कुराणाच्या माध्यमातून प्रकट झालेले ज्ञान सर्व सामान्य लोकांकरीता तर गुढ विद्या हे दुसऱ्या स्वरुपाचे ज्ञान असून हि विद्या गुरु परंपरेनुसार शिष्याकडे पोहोचविली जाई त्याला ***सु***फीची विद्या असे संबोधले जाते. आणि या ज्ञानालाच 'सुफी तत्त्वज्ञान' असे म्हणतात. प्रामुख्याने या तत्त्वज्ञानाची बिजे आपणांस पवित्र कुराण, हदीस, पैगंबराचे बोध वचन यांच्या माध्यमातुन ***दि***सून येतात.

इस्लाम धर्माच्या सुरुवातीच्या कालखंडात सुफी संतांनी निवृत्तीच्या मार्गालाच प्राधान्य देऊन त्याचा अत्यंत काटेकोरपणे पालन केल्याचे आढळते. या पृथ्वी तलावरील मोह माया, चैन विलास, सुख समृध्दी, या सर्व गोष्टींचा त्याग करुन गरीबी जिवनाचा स्विकार करुन एकांतात राहुन कठोर तपश्चर्या करणे याला सुफींनी महत्त्व देऊन ***त्या***चा स्विकार केलेला होता. म्हणजेच सुफी संतांनी वासनेचे स्वरुप नाहिसे करुन ईश्वराचा साक्षात्कार, त्याचे चिंतन करणे याला प्राधान्य दिलेले होते. इतिहासकार इब्न खाल्दुनच्या मते, 'परमेश्वराचे चिंतन करणे हि सुफींची प्रारंभीच्या काळातील तत्त्वे होती. म्हणजेच परमेश्वरांची वकृदृष्टी, भिती सुफींच्या मनात सदा सर्वकाळ जागृत होती.

- **भारतातील सुफी पंथ**

अरबांच्या सिंध वरील स्वारीपासून सुफी संत भारतात येऊ लागले. भारतात लष्करी विजयाच्या मार्गाने जो प्रदेश जिंकला होता त्याचा लाभ घेऊन लोकांना इस्लामाची दिक्षा देऊन इस्लामासाठी अनुयायी मिळावे हा उद्देश होता. त्यांनी अनेक ठिकाणी आपले मठ स्थापन केले व भारतीय साधुसारखी वस्त्रे परिधान ***के***ली व त्यांच्या जिवनशैलीचे अनुकरण केले. हिंदुची वस्ती असलेल्या शहरांच्या अगदी जवळ जिथे कनिष्ठ जातींच्या लोकांची वस्ती होती तिथे त्यांनी आपले बस्तान बसविले. इस्लामांचा स्विकार करावा यासाठी हिंदुना आग्रह करुन त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न त्यांनी केला. बहुतांश काळ दिल्लीच्या सल्तनतीचा विस्तार भारताच्या एका भागापुरताच मर्यादित होता. परंतु सुफी पंथ मात्र देशभर पसरला व त्यांनी भारतात शांततामय मार्गाने इस्लामाचा प्रसार केला. अर्थात यात हिंदु राज्यकर्त्यांची उदारता आणि मनाचा मोठेपणाही ***दि***सून येतो.

- **सुफी पंथाची शिकवण**

एकेश्वरवाद या इस्लामांच्या मुलभुत तत्त्वज्ञानावरच सुफी तत्त्वज्ञान आधारलेले होते. असे असले तरी भारतीय गुढवादी व भक्तिपंथाचे पुरस्कर्ते यांच्या प्रमाणेच अंतिम सत्य किंवा सर्वोच्च निर्माता याचे स्वरुप तसेच निर्माता व निर्मीती यांच्यामधील संबंधाची कल्पना करताना त्यांनी ***विचा***रांची व तात्त्विक विवेचनाची नवी दिशा अवलंबविली होती. भक्ती सुधारणे प्रमाणेच सुफी संतामध्येही आपल्या शिकवणुकीच्या प्रसारासाठी वापरलेल्या ***पध्द***तीच्या संदर्भात मतभेद होते. ***म्हणूनच*** आपल्या विकासाच्या अंतिम टप्प्यात सुफी पंथ अनेक सुफी धर्म ***प्रसार***कांच्या अनेक गटात विभागला गेला.

सुफी पंथाचे एकेश्वरवादी तत्त्वज्ञान हे वाहदत-उल-वजूद च्या किंवा अस्तित्वाच्या ऐक्याच्या सिंध्दातावर आधारलेले होते. सर्व चराचर वस्तु एकाच ***मूल*** तत्त्वापासुन निर्माण ***झा***ल्या आहेत. असे हा सिध्दांत सांगतो. निर्माता (हक) आणि निर्मीती खलक यांच्यात एकरुपता असते. ***ईश्वराचे*** अस्तित्व हिच विविधतेमागील एकता आणि सर्व घटनाचक्रामागील वास्तव आहे. या सिध्दांताचे जनक शेख मुहिऊद्दिन इब्नुल अरबी हे पुढील शब्दात त्याचे वर्णन करतात. **"ईश्वराशिवाय येथे काहीच नाही, ईश्वराशिवाय दुसऱ्याचे *कशाचेही* अस्तित्व नाही. येथे सर्व वस्तुंचा गाभा एकच आहे."**

सुफींच्या मतानुसार अदृश्य व सर्वोच्च वास्तव्य आणि चिरंतर सौदर्य म्हणजे जमाल आहे. त्यांच्या मते हे विश्व केवळ माया नसून ईश्वराचे दृश्य व बाह्य अभिव्यक्त

स्वरुप म्हणजे हुस्न किंवा प्रेम करण्याजोगे सौदर्य आहे. सुफींनी आग्रहाने असे मत मांडले आहे की, चिरंतर सौदर्याचे सर्वात महत्त्वाचे लक्षण हे स्वरुपाची अभिव्यक्ती आणि कुणीतरी आपल्यावर प्रेम करावे ही भावना होय. ***म्हणूनच*** सुफी तत्त्वज्ञान हे प्रेम या तत्त्वज्ञानावर आधारलेले होते. ते सर्व धर्माचे सार आणि सर्व निर्मीती मागचे कारण आहे. सुफी अनुयायाला ईश्वराशी एकरुप होण्यापुर्वी समर्पणाच्या दहा पायऱ्या पार कराव्या लागतात. या दहा पायऱ्या अशा तौबा (पश्चाताप), वारा (मितभोग-संयमशील), सब्र (सहनशिलता), झुहद (धर्मनिष्ठा), फकर (गरीबी), रजा (इच्छा आशा), तवक्कुल (समाधान), खौफ (भय), शुक्र (कृतज्ञता) आणि रीजा (ईश्वरी इच्छेपुढे समर्पण).

- **भारतातील प्रमुख सुफी संत**

सुफी अनुयायांनी सिलसिला या पंथामध्ये विभागले गेले होते. एका अंदाजानुसार मुस्लीम जगतात सुफींचे १७५ सिलसिले अस्तित्वात होते. अबुल फजलने भारतामध्ये आलेल्या सुफी सिलसिलांचा उल्लेख केलेला आहे. पण प्रत्यक्षात फक्त दोनच सिलसिले आपली पायेमुळे या ***भू***मीत ***रुज***वू शकले. त्यांची नांवे चिस्ती आणि सुऱ्हावर्दी अशी होती. यापैकी सुऱ्हावर्दीचा प्रभाव सामान्यपणे सिंध आणि वायव्य भारतात होता. तर चिस्तींचा प्रभाव जवळजवळ संपुर्ण भारतात होता. भारतात चिस्ती सांप्रदायाचे काम ख्वाजा मुईनद्दीन चिश्ती व त्यांचे शिष्य शेख हमिऊद्दीन शेख कुतुबुद्दीन, बख्तीयार काकी, शेख फरीद, हजरत निजामुद्दीन अवलिया, शेख सलीम चिस्ती, उददीन झकारीया व त्यांच्या शिष्यांनी केले.

- **सामाजिक समतेत सुफींचे योगदान**

सुफी तत्त्वज्ञानावर बौध्द व वैदिक तत्त्वज्ञानाचा काही परिणाम घडून आला होता. तेंव्हा अशारितीने दुरस्थ भारतीय सांस्कृतिक वारशामुळे बौध आणि वेदांत तत्त्वज्ञानासारखीच धार्मिक बैठक आणि अभिव्यक्तीची पध्दत सुफी पंथाला प्राप्त झाले. भारतामध्ये सुफी पंथाच्या विकासाला भारतीय विचार व सामाजिक वातावरण कारणीभूत होते. बौध्द भिक्षुच्या आणि हिंदुच्या मठाप्रमाणेच सुफींनी आपले 'खानकाह' हे मठ बांधले. तेथे भारतीय पध्दती व रितीरिवाज यांचे पुर्णपणे अनुकरण केले होते.

हिंदु आणि मुस्लीम यांच्यात समेट घडवून आणण्यात सुफी पंथांनी काही उपयुक्त सकारात्मक भूमिका बजावली. सुफींनी विशेषतः चिश्ती पंथीय संतांनी कनिष्ठ हिंदु जातीशी संबंध प्रस्थापित केले व स्वेच्छेने धर्मांतर घडवून आणले. सुफी तत्त्वज्ञान व चिंतन याला हिंदु बुध्दीजिवीमध्ये खुपच लोकप्रियता लाभली. धर्माचरणाने व श्रध्देने हिंदु असणारा ***परंतू*** गुढवादी तत्त्वज्ञान फारसी व उर्दु ***भा***षेतून मांडणारा सुफी संताचा एक वर्ग उदयास आला. सुलेहकुल किंवा वैश्विक बंधुभावाचा जो सुफी सिध्दांत होता. त्यांच्या ***मानवतावादाचे*** आव्हान या परिवर्तनामागे होते. त्यांनी धर्माची सर्व बंधने व अडसर ***ओलांडून*** हिंदु व मुस्लीम यांच्यात बंधुभावाची जाणिव विकसीत केली. हिंदु-मुस्लीम यांच्यात ऐक्य घडवून आणण्यात सुफी संतांनी मोलाची भर घातली. सर्वसामान्यपणे सुफी संतांच्या चळवळीला भारतीय समाजातील जनसामान्याकडून आदराची वागणूक दिली गेली. अशारितीने हिंदु संतांबद्दल मुस्लीमांनी आदर दाखवावा आणि मुस्लीम संताबददल हिंदूनीं तशाच प्रकारची आदराची भावना व्यक्त करावी. अशा प्रकारचे दृश्य मध्युगीन काळात भारतात सर्वत्र पहावयास मिळते.

**निष्कर्ष :-**

भारतीय समाज जिवनात हिंदु व मुस्लीम या दोन्ही धर्मात, समाजात सामाजिक समता, सामाजिक एकता प्रस्थापित करण्याच्या ***दृष्टीने मह***त्वपूर्ण कार्य सुफी संप्रदायाने केले. असे दिसून येते.

**संदर्भ :-**


१. पगडी सेतू माधवराव- सुफी संप्रदाय परचुरे प्रकाशन मंदिर, मंुबई १९५३.
२. वकिल अलीम- सुफी संप्रदायाचे अंतरंग प्रतिमा प्रकाशन, पुणे मार्च २०००.
३. डॉ. शेख एजाज सुफी संप्रदाय (तत्त्वज्ञान-धार्मिक व सामाजिक) चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद २००९.
४. चौहान देवीसिंग- मराठी आणि दखनी हिंदी प्र. महाराष्ट्र भाषा पुणे, १९७१.